
वर्ष १५ • अंक ३ • १६ जून २०१५ किंमत रु. १५/-

# पालकनीती

पालकत्वाला वाहिलेले मासिक



**पा ल क नी ती**

पालकत्वाला वाहिलेले मासिक

**संपादक**
संजीवनी कुलकर्णी

**संपादक मंडळ**
प्रकाश अनभूले
मधुरा राजवंशी
वसीम मणेर
सोमीनाथ घोरपडे
नीला आपटे
मंजिरी निंबकर

**मुखपृष्ठ व अंक मांडणी व रेखाटने**
वसीम मणेर

**रेखाटने**
कल्पिता दंडवते

**अक्षरजुळणी**
स्वाती जामदार

**जानेवारी ते डिसेंबर २०१५ साठी वर्गणी रु.२००**

वर्गणीचा चेक / ड्राफ्ट
'पालकनीती परिवार'
या नावाने काढावा.

**संपर्क :**
**पालकनीती परिवार,**
प्रगत शिक्षण संस्था
रिंग रोड, लक्ष्मीनगर,
फलटण ४११५२३
०२१६६ २२३०४१
psspalakneeti@gmail.com
www.palakneeti.org

पालकनीती परिवाराचे प्रकाशन
वर्ष १५ वे अंक ३ रा
१६ जून २०१५



लेखांत व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावीत.


## या अंकात


- **बंगल्यातली शाळा** – प्रकाश अनभूले
- **शाळा नावाचे मृगजळ** – कृतिका बुरघाटे
- **निर्णय शाळा प्रवेशाचा** – डॉ. राजेश बनकर
- **मी मराठी शाळेत शिकवतोय** – फारुक काझी
- **पुस्तक परीक्षण – शाळा: एक स/मजा** – विभा देशपांडे
- **सकारात्मक ऊर्जा देणारे एटीएफचे संमेलन** – सोमीनाथ घोरपडे
- **ज्ञानाची भाषा?** – नीला आपटे
- **विचार करून पाहू – बाळ निघालं शाळेला** – नीलिमा गोखले, मंजिरी निंबकर
- **शहाणी वेबपाने – मुलांनी पहावेच असे काही** – मधुरा राजवंशी





मुले शाळेत येण्यासाठी
मी काय करणार?
रडली तर जवळ घेणार.
नीट शिकवणार.
फिरायला नेणार.
रोज खेळायला सोडणार.


माझी शाळा चित्रे व कल्पना
इ. १ ली
कमला निंबकर बालभवन, फलटण


संपादक, मुद्रक, प्रकाशक व मालक – डॉ. संजीवनी कुलकर्णी यांनी पालकनीती परिवार करिता ग्रीन ग्राफीक्स, सी–१०२, सुनिता अपार्टमेंट, १४१७ कसबा पेठ, पुणे–४११०११ येथे छापून घेऊन अमृता क्लिनिक, संभाजी पूल कोपरा, कर्वे रस्ता, पुणे–४११००४, येथे प्रकाशित केले.



या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.

# संवादकीय



घर ही मुलांची पहिली शाळा असते आणि आई ही त्याची पहिली गुरू असे म्हटले जाते. आणि खरेही आहे ते. याचे कारण मूल आपल्या परिसरातच प्रथम शिकते. त्याच नात्याने घर ही त्याची पहिली शाळा असते. मुलांचे हे शिक्षण अनौपचारिक रीतीने व तणावमुक्त परिस्थितीत होते. हे शिक्षण मुलांच्या ओळखीच्या वस्तूंच्या, आजूबाजूला चाललेल्या कामांच्या व कृतींच्या संदर्भात होते. एखाद्या मुलीला योग्य आकाराच्या डब्याला योग्य ते झाकण लावता येत नसेल तर तू चूक आहेस, तुला काही येत नाही, असे कोणी टोचून बोलत नाही. उलट तिला प्रोत्साहन देऊन काम पूर्ण करायला मदत केली जाते. शिकण्यासाठी भरपूर अवकाश दिला जातो. तिला येथे परीक्षा नसते. घरी चालणारे सारे शिक्षण तिच्या परिचयाच्या भाषेतून असते आणि ती भाषा नक्की कशी वापरायची याचे धडे तिला प्रत्यक्ष वापर पाहून मिळत असतात. येथील शिक्षकांना म्हणजे घरातील व्यक्तींना कुठलीही शिक्षणशास्त्राची पदवी आहे किंवा नाही याची तिथे गरज नसते. मुलांविषयीची पोटातून येणारी माया हीच त्यांची अर्हता. प्रत्येक मूल शिकण्याची क्षमता घेऊन जन्मते, असा ठाम विश्वास घेऊनच पालक मुलांना शिकवीत असतात. इतक्या बालपणी मुले प्रामुख्याने आपल्या शरीराच्या अवयवांचा वापर करायला शिकत असतात व ती आज नाही उद्या ते शिकतातच. यासाठी कसला अभ्यासक्रम नाही. काही मुले वर्षाची असताना चालायला शिकतात, काही १० महिन्याचीच चालत असतात तर काही २ वर्षाच्या आसपास आल्यावर चालू लागतात. पण त्यांना तो वेळ दिला जातो. एका वर्षात अमुक इतके आले पाहिजे असा अट्टहास नसतो.

घर सोडून मुले जेव्हा शाळेत जातात तेव्हा त्यांचे औपचारिक शिक्षण सुरू होते. आमच्या मुलांना हे हे शिकवले पाहिजे अशी जबाबदारी समाजाने शाळांना दिली आहे. त्यानुसार आपले अभ्यासक्रम बनवले जातात. ते अभ्यासक्रम शिकविण्याची जबाबदारी शिक्षकांवर टाकलेली असते. त्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण शिक्षकांना दिले जावे अशी अपेक्षा असते. प्रत्यक्षात पाहिले तर प्राथमिक व माध्यमिक विभागांसाठी असणाऱ्या राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यासारखा बालवाडीसाठी आपल्या देशात कसलाही प्रमाण अभ्यासक्रम किंवा त्याचा आराखडा नाही. विविध राज्ये आपापला अभ्यासक्रम बनवतात. त्यातील बरेचसे बालशिक्षणाच्या जुन्या संकल्पनांवर आधारित आहेत. बालशिक्षकांच्या प्रशिक्षणाचीही तीच गत आहे. तसे पाहिले तर डी.एड., बी.एड. च्या अभ्यासक्रमांचाही मुळापासूनच पुनर्विचार करण्याची गरज आहे. या अभ्यासक्रमांमध्येही पेडॅगॉजी' किंवा अध्यापन पद्धती शिकविली जात नाही. त्यामुळे कित्येकदा वर्गात नक्की करायचे कायहे शिक्षकांना न कळून ते पाठ्यपुस्तक वाचून दाखवितात. शाळा निवडताना शिक्षकांना शिकविता येते किंवा नाही याची पालक कधीच खाराखुरी करीत नाहीत. करणार तरी कशी म्हणा ? कारण पालकांना वर्गात प्रवेश नसल्याने शिक्षक व मुलांच्यात काय देवाणघेवाण चालते ते त्यांना कधी कळतच नाही.

बहुसंख्य मुलांसाठी शाळेची भाषा परकी असते. काही मुलांच्या बाबतीत त्यांच्या घरच्या भाषेचे आणि शाळेच्या भाषेचे नाव एकच असते. परंतु शाळेतील भाषेचा वापर, सूचनांची भाषा, नियमांविषयीचे शब्द वेगळे असतात. मुलांना भाषेच्या नावाशी काहीच देणेघेणे नसते. आजूबाजूला वापरात असणाऱ्या अनेक भाषा मूल बोलायला शिकू शकते. सहजपणे एका भाषेतून दुसऱ्या भाषेत प्रवेश करू शकते. कुठल्याच माध्यमाचे अवडंबर न माजवता अनेक भाषा आपण शाळेत येऊ देऊ शकतो. शाळा बहुभाषिक बनवू शकतो. मुलांची घरची भाषा त्यामुळे शाळेत येते. शाळेत काय चालले आहे ते मुलांना समजायला मदत होते. त्याचबरोबर घरची भाषा आणि माध्यमाची भाषा एकत्रितपणे व परस्पर देवाणघेवाणीने वापरली तर मुलांना दोन्हीही भाषा आपल्याशा वाटू लागतात. मुलांची शिकण्याची पद्धत समजून घेतली तर पाठांतराने किंवा ठाकून-ठोकून मुले भाषाच काय, पण काहीच शिकत नाहीत. मग अशा परिस्थितीत इंग्रजी, मराठी, हिंदी, लमाणी, वडारी, गोंडी अशा कोणत्याही व कितीही भाषांमध्ये संवाद साधण्याची मुलांना परवानगी दिली तर कल्पना करा मुले किती बहुभाषिक बनतील! भाषातज्ज्ञांनी तर म्हणून ठेवलेच आहे की एका भाषेवरील प्रभुत्व दुसरी भाषा शिकण्यास मदत करते. त्यामुळे शाळांच्या माध्यमांच्या बाबतीत बहिष्काराची किंवा प्रतिबंधाची भाषा न बोलता समावेशाची किंवा अंतर्भावाची भाषा बोलावी. इंग्रजी सोडून दुसऱ्या कुठल्याच भाषेत बोलायचे नाही असे न म्हणता तुमच्या बोलण्यामध्ये इंग्रजीचाही अंतर्भाव करा असे म्हणायला हवे. मग माध्यमाचा प्रश्न इतका गंभीर बनणार नाही. दुर्दैवाने पालकांचा हा अट्टाहास असतो की आपली भाषा नीट बोलता आली नाही तरी चालेल पण इंग्रजी आली पाहिजे. येथे पालक प्रबोधनाला वाव आहे.



ग्राहक म्हणून शिक्षणात जसा पालक व बालक हा महत्त्वाचा घटक आहे तसा शिक्षक हा अंमलबजावणी करणारा म्हणून महत्त्वाचा घटक आहे. दुर्दैवाने दिलेल्याची अंमलबजावणी करणे एवढीच भूमिका शिक्षकांना देऊन आपण एक बहुमूल्य मानवी संसाधन वाया घालवतो आहोत. सत्ताधाऱ्यांना बोट दाखवायला कोणीतरी लागतेच. बळीच्या बकऱ्याची ही भूमिका शिक्षकाकडे आली आहे. आजचा शिक्षक मात्र आता शहाणा होत चालला आहे. त्याने आवाज उठवायला सुरुवात केली आहे. स्वसमृद्धीसाठी मला काय हवे आहे व ते कसे शोधायचे हे त्याला कळले आहे. या अंकातल्या एटीएफ शिक्षकसंमेलनाच्या लेखात याचे प्रतिबिंब आपल्याला दिसेल. आम्हाला हा एक आशेचा जोरदार किरण नक्कीच दिसतो आहे. या शिक्षक चळवळीने 'स्नोबॉल इफेक्ट' दाखवून सारे शिक्षक जोडून घेतले तर शिक्षण सुधारण्यास वेळ लागणार नाही. ●●●

# बंगल्यातली शाळा

– प्रकाश अनभुले

दोन वर्षांपूर्वीची गोष्ट. जूनचा दुसरा आठवडा होता. सर्व शाळा सुरू झाल्या होत्या. मी मुलाला त्याच्या शाळेत सोडायला घरातून निघालो. एका ठिकाणी रस्त्यावर दोन चाकी आणि चार चाकी गाड्यांनी रस्ता अडवला होता. मुलांचा रडण्याचा आवाज येत होता. मी थोडे जवळ गेलो. रस्त्याच्या एका बाजूला छोट्याश्या बंगल्याच्या बाहेर भले मोठे पोस्टर लावले होते. पोस्टरवर परदेशी मुलांचे टाय वगैरे लावून टिपटॉप फोटो झळकत होते. त्या छोट्याश्या बंगल्यात एक इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू झाली होती. शाळा आणि बंगल्यात? थोडे अवाक करणारे प्रकरण होते हे. मी त्या गर्दीतून वाट काढीत पुढे निघालो. डोक्यात विचार सुरू होते. जेमतेम २००० चौरस फुटाच्या जागेत ६० ते ७० बालवाडीच्या वयाच्या मुलांची शाळा तेही स्वतःच्या रहिवासानुरूप बांधलेल्या बंगल्यात? कालपर्यंत कुठलाच मागमूस नसलेले हे नवे रूप या बंगल्याने घेतले तरी कसे? आणि मान्यताही अगदी हवेतून घेतल्यासारखी मिळाली? सारेच जरा अजब होते.

आम्ही आमच्या शाळेतून दरवर्षी शासन दरबारी प्रतवारी भरीत असतो. त्यात शासनाने शाळेची इमारत, शौचालये, क्रीडांगण, रॅम्प, चांगलासा वर्ग जिथे पुरेशी हवा आणि उजेड असावा असे अनेक निकष दिलेले असतात. हे प्राथमिक आणि महत्त्वाचे निकष प्रत्येक शाळेसाठी लागू आहेत. या सर्व निकषांना शंभर टक्के बाजूला सारणारी शाळा म्हणजे ही बंगल्यातली शाळा. खरे तर २-३ खोल्यांच्या अशा बंगल्यात वर्ग भरवणे आणि तेही बालवाडीचे हे कल्पनेच्या बाहेरचे वाटत होते. रोज जसजसे या बंगल्यातल्या शाळेसमोरून माझी गाडी जात होती तसतशी तेथे गर्दी वाढताना दिसत होती. भली मोठाली आकर्षक पोस्टर्स आणि अमुक एक मान्यता असे दिसले की पालकवर्ग आकर्षला जातो. मग त्या शाळेला खरीच अशी मान्यता आहे का याचा कोणीच विचार करीत नाही.

ही बंगल्यातील शाळा रस्त्यालगत असल्यामुळे येता जाता इथले सर्व कार्यक्रम, म्हणजे पेरन्ट्स डे, मदर्स डे, फादर्स डे आणि ॲन्युअल डे चा तो कल्चरल प्रोग्रॅम म्हणजे तर केवढे ग्रेटग्रँड सेलिब्रेशन असते हे लांबून पाहण्याची संधी मिळत असते. तिथला तो चमचमाट, पालकांच्या खर्चातून आणलेली रंगीबेरंगी ड्रेपरी, कोरिओग्राफरच्या नजरेच्या इशाऱ्यावर आणि एखाद्या ढाकचिक ढाकचिक गाण्याच्या तालावर मुले जेव्हा स्टेजवर येऊन नाचू लागतात, तेव्हा पालकांना कृतकृत्य झाल्यासारखे वाटू लागते हे विशेष. कदाचित हीच अपेक्षा पालकांनी पाल्याला शाळेत घालताना केलेली आहे का काय असे वाटते. सर्वात महत्त्वाचे या साऱ्यामधून मुलं काय शिकतात, त्यांच्यावर काय परिणाम होतो याचा विचार कुठे केला जात नाही.

त्यानंतर काही महिन्यांतच अशा बंगल्या-बंगल्यातल्या शाळांचे आमच्या अवती-भोवती पीकच येऊन राहिले. छोट्या छोट्या बंगल्यांच्या बाहेर पाट्या लागू लागल्या- ‘जगभर १५० हून शाखा असलेली एकमेव इंग्रजी शाळा’, ‘संपूर्णतः संगणकीकृत अभ्यासक्रम’, ‘सीबीएसई पॅटर्नची इंग्रजी शाळा...’ दुर्दैवाने यात प्रशिक्षित शिक्षक आणि ज्ञानरचनावादी शिक्षण अशा पाट्या मात्र कुणी लावताना दिसत नाही. कदाचित ते त्यांचे उद्दिष्टच नसावे. गावात जाणाऱ्या महत्त्वाच्या रस्त्यालगत बंगल्या-बंगल्यांतच या शाळा सुरू होतात आणि विशेष म्हणजे अशा ठिकाणी पालकवर्गही आकर्षला जात असल्यामुळे प्रत्येकाकडे ‘ॲडमिशन्स फुल’ होऊ लागतात. आपल्या पाल्याला फाड फाड इंग्रजी बोलता आले पाहिजे आणि तेच पुढील शिक्षणासाठी महत्त्वाचे असते असा गैरसमज झालेला पालकवर्ग अशा शाळांचा सभासद बनतो. मग भले स्वतःला त्या भाषेबद्दल काही माहिती नसली तरी. साधी भाजी घेताना चार चार वेळा विचार करणारा पालकवर्ग मुलांच्या भवितव्याचा विचार करताना फक्त वरकरणी दिसणाऱ्या जाहिरातींना भुलून कसा जातो हेच समजत नाही.

काही काळापूर्वी हळूहळू येऊ पाहात असणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या वादळात मराठी शाळा टिकवण्याची स्पर्धा सुरू होती. मराठी शाळा आपले अस्तित्व टिकवण्याच्या प्रयत्नात होत्या. आज परिस्थिती जरा वेगळी आहे. मागणी तसा पुरवठा या नियमाप्रमाणे दरवर्षी असंख्य इंग्रजी माध्यमाच्या शाळा उभ्या राहात आहेत. त्यामुळे आज एक इंग्रजी माध्यमाची शाळा दुसऱ्या नव्याने येणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेसमोर टिकण्यासाठी जोरदार जाहिरातबाजी करताना दिसत आहे. आज चांगल्या पेपरमध्ये एक पानभर जाहिरात देणे म्हणजे कमीतकमी लाखभर रुपये मोजावे लागतात. या छोट्याशा काल परवा ‘मार्केटमध्ये आलेल्या’ शाळांच्या अशा जाहिराती पाहून यांचे अर्थकारण काही समजत नाही. लाखो रुपये फक्त जाहिरातीवर उधळणाऱ्या शाळांची फी किती असेल याचा विचार करूनही खरे उत्तर काही मिळत नाही. माझ्या शेजाऱ्यांनी परिस्थिती नसताना आपली दोन्ही मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घातली. त्यांच्या फीपोटी खाजगी फायनान्स कंपन्यांकडून कर्ज घेतली. आज कर्ज लाखो रुपये झाले पण मुलांचा काहीच विकास होताना दिसत नाही. पाचवीपर्यंत शिक्षण होऊनदेखील साधे एक वाक्य इंग्रजीमधून बोलता येत नाही याचा सल त्यांना सहन होत नाही. आपलेच मूल गतिमंद आहे असा त्यांचा समज ठाम होताना दिसत आहे. हे पालक स्वतः लिहिता-वाचता येईल इतपतच शिक्षित आहेत. आणि आज प्रशिक्षित शिक्षक मिळत नाहीत ही अवस्था अनेक इंग्रजी शाळांची आहे. या शाळा जागतिक दर्जाच्या एखाद्या कंपनीसारखी कुणाची तरी फ्रँचाइझी घेतात आणि मग त्या

मृगजळामागे सर्वांना भुलवतात.

रोज गवतासारख्या उगवणाऱ्या या शाळांतील मुले कितपत इंग्रजी संभाषण कौशल्ये शिकतात? येथे आमच्या शाळेच्या मुख्याध्यापकांचा एक अनुभव द्यावा वाटतो. ते त्यांच्या पाहुण्यांबरोबर एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत गेले होते. त्यांनी तेथे विचारले, ''खरेच ही छोटी छोटी मुले इंग्रजी बोलतात का हो?'' उत्तर आले– ''आम्ही शिक्षकांकडे एक काडीपेटी ठेवतो. इंग्रजीमधून बोलला नाही तर चटका दिला जाईल असे मुलांना सांगितले जाते.'' काय म्हणावे अशा शाळांना? यात सर्वात धक्कादायक म्हणजे हे अयोग्यच नाही तर एक गुन्हादेखील होऊ शकेल याची साधी जाणही उत्तर देणाऱ्याला नाही, उलटपक्षी ते त्याला भूषण वाटावे? मुलांचा भावनिक, मानसिक अथवा शारीरिक छळ करण्याचा अधिकार खुद्द त्यांच्या जन्मदात्या पालकांनादेखील नाही. मग अशा शिक्षावजा धमक्या देऊन मुलांच्या तोंडून इंग्रजी वदवून घेणाऱ्या शाळांचे काय? यांचा समाचार कसा आणि कोणी घ्यायचा?

मूल स्वतःच्या मातृभाषेत विचार करणे शिकले तर ते मांडण्यासाठी इतर भाषा शिकणे कधीच कठीण नसते. पण ना धड मातृभाषेवर प्रभुत्व ना इंग्रजी भाषेचा विकास अशी स्थिती मुलांच्या सर्वांगीण विकासाला कायमची खीळ घालणारी ठरू शकते. आज खूप मोठा विद्यार्थीवर्ग असाच आहे. या मधल्या स्थितीमध्ये अडकलेल्या मुलांचे पालकही आज खूप मोठ्या गोंधळात आहेत.

जागतिक संपर्कासाठी इंग्रजीवाचून पर्याय नाही असा इंग्रजी समर्थकांचा एक युक्तिवाद कायमच असतो. पण युरोपमध्ये अथवा इतर देशात जर पाहिले तर ते देश आपापल्या भाषेमध्येच अभिमानाने व्यवहार करताना दिसतात. इंग्रजी येत नाही हा त्यांना न्यूनगंड वाटत नाही. आपल्याकडे मात्र इंग्रजीचे प्रस्थ एवढे माजवून ठेवले गेले आहे की फाडफाड इंग्रजी न येणे हे न्यूनगंड निर्माण करणारे ठरू लागले आहे. खरे तर बुद्धिमत्ता ही एखाद्या भाषेशी निगडीत कधीच नसते. अगदी प्राथमिक स्तरावरही मुलांमध्ये इंग्रजीचे बीजारोपण करण्याचा जो अट्टहास चहूबाजूंनी चालला आहे आणि तोही अप्रशिक्षित शिक्षक असलेल्या या बंगल्यातील शाळांमधून. त्यातून धड इंग्रजीचे ज्ञान नाही आणि धड मातृभाषेचीही जाण नाही अशा विद्यार्थ्यांच्या पिढ्यांमागून पिढ्याची पैदास होत राहतील.

शाळा निवडताना बरेच पालक मुख्याध्यापकाला इंग्रजी बोलता येत आहे म्हणजे येथे आपले पाल्य इंग्रजी बोलायला शिकेल असा तर्क लावतात. शाळेतील एका शिक्षकाला अथवा मुख्याध्यापकाला इंग्रजीमधून बोलता येते म्हणजे बस झाले का? शाळेच्या दर्जाचे काय? शाळेचे माध्यम कोणतेही असू देत पण बेकायदा शाळा, अप्रशिक्षित शिक्षक आणि एकंदरच दर्जाचा अभाव या समस्यांकडे मात्र लक्ष दिले जावे. मुलांना आपण शाळेत जेव्हा घालतो तेव्हा त्यांना लिहिता–वाचता यावे एवढेच अपेक्षित नसते त्यांच्यामध्ये ज्ञान घेण्याची ओढ निर्माण करणे आणि त्यांना ज्ञानग्रहणाची सवय होणे याही गोष्टी साधायच्या असतात हे आपण समजून घेणे गरजेचे आहे. कारण लिहिता वाचता येण्यासाठी शाळा हा समज आणि गरज कधीच कालबाह्य झाली आहे.

आज आमच्या अवती भोवती उभ्या राहिलेल्या या बंगल्यातील शाळांमध्ये बरीच महागडी खेळणी मुलांसाठी उपलब्ध आहेत मात्र ती कशी वापरायची याची पुरेशी माहिती शिक्षकांनादेखील नसते असे दिसून येते आणि अशा खेळणी मुलांना देण्यामागील उद्देशदेखील कोणाला माहीत नसतो. शिवाय अशी महागडी खेळणी मुलांना मुक्तपणे हाताळायला दिली जात नाहीत. मग अशा सुविधा असलेल्या शाळांची निवड करून काय फायदा होणार आहे?

इंग्रजी ही ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान आणि इतर अनेक विषयांमधील अद्ययावत घडामोडींची खिडकी आहे हे खरेच आहे. आजच्या काळामध्ये इंग्रजीची कवाडे बंद करणे हा आत्मघात ठरेल हेही खरे आहे, परंतु मुलांच्या शिक्षणाचा विचार करता त्यांचा सर्वांगीण विकास लक्षात घेणे अधिक महत्त्वाचे आहे. बंगल्यातील शाळांचे आणि तेथील मुलांचे भविष्य काय हे सांगता येत नाही. अशा शाळांचा समाचार शासन दरबारी कधी घेतला जाईल आणि घेतला गेलाच तर कार्यवाही काय होईल हेही निश्चित नाही. मात्र या रोज जन्मणाऱ्या, पुरेशा सुविधा नसणाऱ्या या बंगल्यातल्या इंग्रजी शाळांमध्ये मुलांना नक्की काय दिले जाते याची चाचपणी करणे ही एक सुजाण समाज म्हणून आपली सर्वांचीच संयुक्त जबाबदारी नाही काय?

**प्रकाश अनभूले**
anbhuleprakash@gmail.com
9960460474



# शाळा नावाचे मृगजळ ... - कृतिका बुरघाटे



कृतिका बुरघाटे या जि. प. उच्च प्राथमिक शाळा, गोवरी, जिल्हा चंद्रपूर येथे उपशिक्षिका आहेत. इंग्रजी आणि सामाजिक शास्त्र हे त्यांच्या अध्यापनाचे मुख्य विषय आहेत. मुलांना समजून घेतल्याशिवाय त्यांना त्यांच्या क्षमतेच्या उच्च पातळीपर्यंत नेता येत नाही असे त्या मानतात. पाठ्यपुस्तकाबाहेरचे वास्तव आणि अधिक अर्थपूर्ण जग समजून घेण्यास, त्याचा आस्वाद घेण्यास आणि त्याचे जतन व संवर्धन करण्यास मुलांना विचारप्रवृत्त करण्याचा त्यांचा प्रयास सतत चालू आहे.

सोनूचा शाळेचा पहिलाच दिवस होता. तिने सकाळी झोपेतून उठताना खूप त्रास दिला. शाळेत जाण्याच्या नावानेच तिच्या पोटात दुखू लागले. कुणाला काही कळेना. तिला खरेच त्रास आहे असे सगळ्यांना वाटले. पण तिने 'मी शाळेत नाही जात' असे म्हटले तेव्हा मात्र हे तिचे नाटक तिच्याच शब्दांनी उघडे पडले आणि तिला आम्ही बळजबरीने शाळेत पाठवले. तिचे हे नाटक ३-४ दिवस सुरूच होते. रोजच सकाळी घरी वातावरण कटकटीचे होऊ लागले. तिला आम्ही बळजबरीने शाळेत पाठवत असू. तसा हा पारंपरिक प्रकार आहे. पहिले ३-४ दिवस मूल शाळेत जाताना रडते, शाळेतून पळून जाऊ नये म्हणून त्याला कोंडून ठेवले जाते, आणि मग हळूहळू मूल त्या वातावरणाशी स्वतःला जुळवून घेते. पण सोनूला हा पर्याय कुणी सुचवला असेल? घराशेजारी एकही घर नव्हते. आजूबाजूला कुणीही शाळेत जाणारेही नव्हते. शाळेविषयी तिला काही माहीतच नव्हते. मग तिने हा बहाणा का केला असावा? ती साडेतीन वर्षांची झाली तेव्हा तिला शाळेत टाकण्याविषयी घरात बोलले जाऊ लागले. 'कोणत्या शाळेत टाकायचे? कॉन्व्हेंटमध्ये घालू... ऑटोने जाईल आणि ऑटोने येईल...' सोनू सारे काही ऐकत असे. तिने शाळा कधी पाहिली नव्हती. शाळा म्हणजे काय असते ते तिला ठाऊकच नव्हते. तिला मज्जा वाटायची की भीती हेदेखील आम्हाला कळले नाही. आताही तिला शाळेत जाताना पोटात दुखल्याचा भास होतो. परीक्षेच्या दिवशी टेन्शन येते. हे सर्वसामान्य उदाहरण आहे. बऱ्याच मुलांच्या बाबतीत असे होते. ही भीती नेमकी कशाची?

एक दिवस तिला गाडीवर शाळेत सोडण्यात आले. गाडी गेटच्या बाहेरच लावायची, फक्त मुलेच गेटच्या आत जाणार आणि सगळी मुले गेटच्या आत गेली की लगेच गेट बंद. 'शाळेला गेट कशाला असते? हे गेट नाही जेलचा मोठा दरवाजा वाटतो', असे ती म्हणाली तेव्हा अनेक प्रश्न मनात आले. तिचा गेटच्या आत जातानाचा चेहरा फारच करूण वाटत होता. आता शाळा सुटेपर्यंत या जेलमध्ये बंद राहावे लागेल अशी तिची कल्पना असावी. खरेच, का असते शाळेला हे गेट? सुरक्षेसाठी? मुले पळून जाऊ नयेत म्हणून? की आत काय चालले आहे हे बाहेरच्या जगाला कळू नये म्हणून?

आपल्या मुलांनी इंग्रजी शाळेत शिकावे म्हणून एक कुटुंब खेड्यातून तालुक्याच्या जवळ राहायला आले. त्यांनी घर बांधले, मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घातली. तीनही मुले शाळेत गेली खरी, पण त्यांना अभ्यास आवडत नसे. त्यांना आवडायचा निसर्ग आणि त्याचे निरीक्षण. त्यांची जिज्ञासा कमालीची होती आणि मानवतेचे मूल्य या मुलांमध्ये ठासून भरले होते. अश्या या मुलांना शाळेने दरवर्षी नापास करण्याचा अट्टहास चालवला होता. त्यांच्या आई-वडिलांना वारंवार शाळेत बोलावून अपमानित केले जात होते. पण आईवडील मात्र मुलांना इंग्रजी शाळेतच शिकविण्याच्या अट्टहासात होते. त्यांना तो त्यांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न वाटत होता. गावातून तालुक्याच्या ठिकाणी मुलांना इंग्रजी शिकवायला आलोय आणि आता इंग्रजी शाळेतून काढून टाकायचे? त्यांना हे पटत नव्हते. मुलांची होणारी रोजची ससेहोलपट त्यांना दिसत नव्हती. शाळेत मुले रोज मार खात आहेत, अपमानित होत आहेत. पण हे सगळे तर शाळेत होणारच, अशीच त्यांची धारणा होती.

त्यांना किती समजावले की मुलांना मराठी शाळेत टाका, मुले गुणी आहेत, चटकन शिकतील. पण नाही. तेही जिद्दीला पेटले होते. अखेर शाळेनेच मुलांना काढून टाकले.

आई-वडील तरीही मुलांना घेऊन दुसऱ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतच गेले. मुलांच्या आवडी-निवडी त्यांनी कधी जाणूनच घेतल्याच नाहीत. मुलांना आठवीपर्यंत नापास न करण्याचे धोरण आले आणि मुले कशीबशी आठवी पास झाली. पण पुढे अडली.

मुले शिकायला तयार नाहीत, त्यांचे वाचन-लेखन, गणितीय ज्ञान शाळेस हवे तसे नाही या सबबीखाली पहिल्या शाळेने इयत्ता ५ वी अखेर त्यांना काढून टाकले होते. केजी १ पासून ५ वी पर्यंत तब्बल ७ वर्षे ती मुले या शाळेत होती. त्यांची फी, पुस्तके, वह्या, गणवेश, ऑटो, अवांतर खर्च, सगळे मिळून लाखो रुपये खर्च झाले. पण हातात काय आले, तर शाळा सोडल्याचा दाखला. तोही नापासचा. काय केले शाळेने या मुलांसोबत? रेप्युटेड शाळा असल्याचा मान होता या शाळेचा. मग तिने या मुलांना का घडविले नाही? शाळा म्हणजे अगदीच कृत्रिम ठिकाण. इथे सगळेच अनैसर्गिक! इथे कसे बोलायचे, कसे वागायचे, कसे खायचे, कसे चालायचे, काय, कधी, कुठे, कुणी, कुणासाठी... सारे सारे ठरलेले! इथली भाषाही ठरावीकच. जेवढे विचारले तेवढेच बोलायचे किंवा सांगायचे. तेवढेच करायचे. किती नियम! हे सारे स्वातंत्र्याला बंदी घालणारे नियम. बळीचे बकरे तयार करणारे ठिकाण असे शाळेविषयी वाटायला लागले. काय करणार शाळेत शिकून तर नोकरीसाठी डिग्री

मिळविणार. त्यापेक्षा दुसरे काही नाही.

शाळेची सर्वात मोठी कृत्रिमता कोणती असेल तर शिकण्या- शिकविण्याचे माध्यम. शाळेत बोलली जाणारी, वाचली जाणारी आणि लिहिली जाणारी भाषा म्हणजे शाळेचे माध्यम. भाषा हे अभिव्यक्तीचे माध्यम आहे हे शाळेत कुठे शिकविले जात नाही. अभ्यासाचे, पाठांतराचे आणि परीक्षा देण्याचे माध्यम भाषा असे भाषेचे सर्वसाधारण स्वरूप शाळेत दिसते. प्रश्नोत्तर लिहिणे म्हणजे आपण मिळविलेल्या माहितीचे केवळ सादरीकरण आहे. त्यात मुलांच्या विचारांना फारसा वाव नाहीच. भाषेत आत्माविष्कार असतो. आत्माविष्काराची कौशल्ये विकसित करण्याचे काम शाळेचे. मुलांच्या मुक्त आविष्काराला वाव देणे शाळेचे कर्तव्य आहे. मुलांची सर्जनशीलता, आत्मविश्वास वाढेल असे काम शाळेने केले पाहिजे.

आत्माविष्कार आणि अभिव्यक्तीचे भाषा हे एकमेव साधन असूच शकत नाही. प्राचीन काळी भाषा अस्तित्वात नव्हती तेव्हा काय अभिव्यक्ती झालीच नाही काय? चित्र काढणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे, नृत्य करणे, शिल्प कोरणे, या साऱ्या अभिव्यक्तीच आहेत. मूल यापैकी बरेच प्रकार शाळेत येताना सोबत घेऊन येते. पण शाळेत या सगळ्या अभिव्यक्तींना स्थान आहे काय?

चांगली शाळा निवडण्यासाठी पालक मूल ३ वर्षाचे होऊ लागते तेव्हापासूनच प्रयत्न करू लागतात. एकदा का चांगली शाळा मिळाली की पुढची ८-१० वर्षे निवांत होण्याची स्वप्ने पाहतात. ही चांगली शाळा निवडताना तिची कोणती वैशिष्टे लक्षात घेतली जात असतील बरे? एका वर्गखोलीत ६० विद्यार्थी बसलेले असतात. एक शिक्षक किती मुलांचे निरीक्षण करू शकत असतील? किती मुलांच्या जन्मजात कलागुणांशी परिचित होत असतील? किती मुलांना न्याय देऊ शकत असतील? असे कित्येक प्रश्न समोर येतात.

चांगल्या शाळेत दाखला मिळावा म्हणून पालक किती धडपडतात, किती केविलवाणे होतात! नुकतीच बदली झालेले डी. एड. चे प्राचार्य आपल्या मुलाच्या प्रवेशासाठी एका रेप्युटेड शाळेत गेले. तेथे ॲडमिशन क्लोज्डचा बोर्ड लावला होता. प्राचार्यांनी खूप प्रयत्न केला. ''मुलांना बसायला जागा नाही हो वर्गखोलीत,'' असे जेव्हा शाळेचे मुख्याध्यापक म्हणाले तेव्हा प्राचार्य म्हणाले, ''खाली बसून शिकेल माझा मुलगा. '' त्यावर मुख्याध्यापक म्हणाले, ''खाली बसण्याची जागाही आता शिल्लक राहिलेली नाही.'' प्राचार्य तरीही जिद्दीला पेटून म्हणाले, ''व्हरांड्यात बसून शिकेल तो.'' बघा किती लाचार झालो आहोत आपण! चांगल्या शाळांची मानके तरी आपल्या लेखी कोणती हे आपल्यालाही ठाऊक नाहीच.

शाळाप्रवेश म्हटले की आठवते पालकांची धावपळ. घराचे शांत वातावरण कधी आणि कसे तापू लागते हेदेखील कळत नाही. मुलाला शाळेत प्रवेश मिळत नाही आणि घरी पालकांचे प्रेम मिळत नाही. एकदा का शाळाप्रवेश झाला तरीही सुखाची झोप कायमची उडालेली असते. शाळेच्या मागण्या सतत वाढत असतात. मुलांचे रोजचे होमवर्क आणि प्रोजेक्ट पूर्ण करता करता पालकांची दमछाक होते आणि शिकवणी वर्गात मुलांची रवानगी होते. शाळा सुटल्यावरही पुन्हा एकदा शाळेत गेल्याचा अनुभव ...किती भयंकर ना हे सगळे!! स्वत:चे अस्तित्वच मुले शाळाप्रवेश झाल्यावर हरवून बसत नाहीत का? त्यांना स्वत:च्या इच्छा पूर्ण करण्यासाठी बोलण्याची आणि हट्ट करण्याचीही उसंत नसते.

मनातले सांगण्यासाठी, खूप काही जाणून घेण्यासाठी उत्सुक असणारे हे मूल म्हणजे चालते बोलते यंत्रमानव वाटायला लागते. जीवन म्हणजे काय हे कळू लागण्याआधीच त्याचे जीवन पुस्तकात बंद होते. मैदानावर हिरव्या गवतावर धावण्याच्या वयात हे मूल स्पर्धेत धावू लागते. जिंकले तर गर्व आणि हरले तर न्यूनगंड बक्षीस म्हणून मिळवीत जाते. स्पर्धेच्या जगात जिंकण्याचा हव्यास त्याच्या अंगी भरला जातो आणि चावी द्यावी तसे शिकवणी वर्ग त्याच्या मागे लावले जातात आणि हे मूल धावत सुटते, चावी संपेपर्यंत. एक संपली की दुसरी... दुसरी संपली की तिसरी...

हेच का शिक्षण? याच का शाळा? यांच्याच प्रवेशासाठी धडपडतात का पालक? शाळा नावाचे मृगजळ वाटते मला तर हे. जे मिळावे, जे मिळेल असे वाटते, ते नसतेच तिथे. शाळा म्हणजे खरे तर जीवनाकडे बघण्याचा एक सुंदर दृष्टिकोन देणारी, व्यक्तीला तिच्या अंगभूत कौशल्याला ओळखण्याची क्षमता प्रदान करणारी, जगण्यासाठी आणि जगविण्यासाठी आवश्यक असलेली मूलभूत कौशल्ये आत्मसात करण्यास आणि तिचा विकास करण्यासाठी संधी देणारी आणि मानवाचा मानवाशी संबंध जोडणारी रचना! जिथे मुलांचे स्वातंत्र्य अबाधित राहील, जिथे त्यांच्या प्रत्येक अभिव्यक्तीची दखल घेतली जाईल, जिथे त्यांना आपल्या मनातील प्रत्येक प्रश्न विचारता येईल, जिथे त्यांना त्यांच्या कलागुणांना उधळण्याची संधी मिळेल, जिथे ती स्वत:हून शिकण्यास प्रोत्साहित होतील, जिथे त्यांना कुणी मागे खेचणार नाही, कुणी त्यांना गप्प करणार नाही, जिथे कुणी त्यांच्या मार्गात 'नको'चे लेबल लावणार नाही... अशा शाळा आहेत का कुठे? अशा शाळांचा शोध पालक घेतात काय? जिथे मुलांच्या सर्जनशीलतेचा मुक्त वातावरणात विकास होईल असे वातावरण देणाऱ्या शाळा खरेच शोधायला हव्यात पालकांनी. अशा शाळा आहेत... फक्त त्या जिवंत ठेवण्यासाठी आणि समाजाच्या नजरेत येण्यासाठी त्यांचा प्रसार आणि प्रचार करण्याची गरज आहे.

**कृतिका बुरघाटे**
krutika.burghate@gmail.com
9604771712

# निर्णय शाळा प्रवेशाचा - डॉ.राजेश बनकर



डॉ. राजेश बनकर हे शासनाच्या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत वरिष्ठ अधिव्याख्याता या पदावर शिक्षक प्रशिक्षक म्हणून कार्यरत असून शिक्षणशास्त्राचे अभ्यासक आहेत. शिक्षणहक्क कायदा, वर्गव्यवस्थापन, शालेय आपत्ती व्यवस्थापन या विषयांचा त्यांचा विशेष अभ्यास आहे.

आजच्या स्पर्धात्मक जीवनात आपल्या मुलांच्या शिक्षणाबाबत पालक अतिशय जागरूक व आग्रही झालेले दिसून येत आहेत. घर, घरातील आई-वडील, भावंडे इत्यादी व्यक्ती, घराजवळील परिसर यात रमलेले मूल जसजसे मोठे होऊ लागते तसतसे पालकांना त्याच्या शाळा प्रवेशाची काळजी सतावू लागते. आधुनिक समाजात औपचारिक शिक्षणाचे प्रमुख केंद्र म्हणून शाळांचे स्थान अबाधित आहे. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये शाळांचा संख्यात्मक विकास चांगला झालेला आहे. त्यामुळे विविध स्तरांवरील, विविध माध्यमांच्या शाळांचा पर्याय बालकांच्या शिक्षणासाठी उपलब्ध झालेला आहे.

जीवन जगण्यासाठी पैशाला आलेले महत्त्व व त्यासाठी चांगली नोकरी आणि ती मिळवण्यासाठी चांगले शिक्षण मिळावे यासाठी शाळा शिक्षणाला महत्त्व दिले जाते. यातूनच सुरू होते मुलांसाठी चांगली शाळा शोधण्याची मोहीम. खेडेगावात पर्यायांची उपलब्धता कमी असल्यामुळे तेथे हा प्रश्न कमी निर्माण होतो. परंतु मोठी शहरे व या शहरांजवळील खेड्यांत मुलांच्या शाळा प्रवेशाचा निर्णय घेताना पालकांचा गोंधळ उडालेला दिसून येतो.

शाळा, परिसर आणि कुटुंब या तीनही ठिकाणी होणारे बालकांचे शिक्षण परस्परपूरक असते. परंतु बहुतांश पालकांना याचे महत्त्व ना माहीत असते ना ते पटते. त्यामुळे आपल्या मुलांना एकदाची चांगली शाळा मिळाली म्हणजे ते निश्चिंत होतात. मुलांच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी फक्त आणि फक्त शाळेचीच आहे या मानसिकतेमधूनच हे होत असते.

अशा प्रकारच्या अवास्तव अपेक्षेमुळे अनेक पालक कोणत्या माध्यमाची, कोणत्या अभ्यासक्रमाची शाळा मुलांच्या शिक्षणासाठी निवडावी याचा निर्णय घेताना गोंधळून जातात. मग समाजप्रवाहाबरोबर एखाद्या प्रसिद्ध शाळेत प्रवेश मिळवण्यासाठी वाटेल ते प्रयत्न पालक करतात. त्यासाठी लागेल तेवढा पैसा भरण्याची तयारी ठेवतात. मात्र हे सर्व करत असताना चांगले दर्जेदार शिक्षण देणारी शाळा कोणती, कोणत्या शिक्षण मंडळाचा अभ्यासक्रम चांगला, याबाबत त्यांच्या जाणिवा पक्क्या नसतात. याशिवाय मुलांचे शाळा प्रवेशाचे नेमके कोणते वय योग्य याचाही विचार त्यांनी केलेला नसतो.

अनेक मानसशास्त्रज्ञ व शिक्षणक्षेत्रातील विचारवंतांनी शाळा प्रवेशासाठी बालकांचे योग्य वय कोणते याबाबत विचार मांडलेले आहेत. वयाची ६ वर्षे पूर्ण झाल्यानंतरच बालकांच्या औपचारिक शिक्षणाची सुरुवात करावी असा सर्वांचा एकात्मिक सूर आहे. त्याचे कारण औपचारिक शिक्षणात शिकण्यासाठी आवश्यक असणारी बालकांची शारीरिक व मानसिक तयारी सर्वसाधारणपणे या वयाच्या मुलांमध्ये झालेली असते. यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने नुकताच एक शासन-निर्णयही घेतलेला आहे.

आज भारतामध्ये विविध बोर्डांचा अभ्यासक्रम राबवणाऱ्या शाळांची स्पर्धा लागलेली आहे. त्यामध्ये राज्य बोर्डाचा अभ्यासक्रम राबवणाऱ्या शाळा, केंद्रीय बोर्डाचा अभ्यासक्रम- सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन (सीबीएसई) राबवणाऱ्या शाळा, यांच्या जोडीला इंडियन सर्टिफिकेट ऑफ सेकंडरी एज्युकेशन (आयसीएसई) हे खाजगी बोर्ड असणाऱ्या शाळा इत्यादी पर्याय शालेय शिक्षणासाठी उपलब्ध होत आहेत. जाहिरातीच्या युगात आमच्याकडे शिक्षण कसे चांगले आहे अशी आपली टिमकी वाजवण्यात या शाळा मागे पडत नाहीत. मग या प्रलोभनाला बळी पडतो तो हा गोंधळलेला पालक.

वास्तविक पाहता भारतातील शालेय शिक्षणाचा कोणताही अभ्यासक्रम अभ्यासला असता त्यामधील मूलभूत तत्त्वे, उद्दिष्टे, पायाभूत संकल्पना समान स्वरूपाच्या असतात. पाठ्यपुस्तकांच्या गुणवत्तेतील थोडा फरक सोडला तर प्राथमिक स्तरावर शालेय शिक्षणाच्या अभ्यासक्रमात कोणताही तुलनात्मक फरक दिसून येत नाही. त्यामुळे पालकांनी अभ्यासक्रमाच्या या प्रचाराला बळी पडू नये.

खरा प्रश्न आहे तो म्हणजे या सर्व अभ्यासक्रमांची अंमलबजावणी करणारी शाळा नेमकी कशी आहे. कारण अभ्यासक्रम कोणता आहे व तो किती चांगला आहे यापेक्षा तो राबवणाऱ्या शाळांमध्ये त्याच्या पूर्ततेसाठी कोणती प्रक्रिया केली जाते याला जास्त महत्त्व आहे. शाळेमधील अध्ययन-अध्यापन प्रक्रिया जेवढी दर्जेदार त्यावर अभ्यासक्रमाचे यश अवलंबून असते. शाळेमध्ये बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणारी शालेय संस्कृती जोपासणाऱ्या शाळा खऱ्या अर्थाने अभ्यासक्रमाला न्याय देत असतात. मग ती शाळा सीबीएसई ची, की आयसीएसई ची किंवा राज्य अभ्यासक्रम बोर्डाची हा प्रश्न गौण ठरतो. सुसज्ज शालेय इमारत, प्रशिक्षित शिक्षक वर्ग, शाळेसाठी जेवढे आवश्यक तेवढे वर्ग आणि त्यात होणारी शिक्षण प्रक्रिया ही खूप महत्त्वाची आहे. बालकांच्या विकासासाठी पालक-शाळा यांचा परस्पर संबंध लक्षात घेऊन बालकाला सर्वांगाने फुलवणाऱ्या शाळा खऱ्या अर्थाने चांगल्या शाळा म्हणून पुढे येतात. बालकांचे प्राथमिक शिक्षण जेवढे समृद्ध असेल तेवढी ती पुढील शिक्षण घेण्यासाठी सक्षम होतील. म्हणून या सर्व बाबींचा विचार पालकांनी मुलांसाठी शाळा निवडताना करणे अत्यावश्यक आहे.

मुलांच्या शाळाप्रवेशामध्ये वय, अभ्यासक्रम याबरोबर शिक्षणाचे माध्यम ही एक महत्त्वाची बाब आहे. या बाबतीत तर फार मोठा गोंधळ पालकवर्गामध्ये झालेला दिसून येतो. माध्यमांच्या बाबतीत इंग्रजी माध्यमाची फॅशनच आल्याची परिस्थिती पहावयास मिळते. इंग्रजी माध्यमाच्या शाळांचा फार मोठा प्रभाव पालकवर्गावर आहे त्याचे कारण म्हणजे साऱ्या जगाची ज्ञानभाषा म्हणून इंग्रजी भाषेला प्राप्त झालेले महत्त्व. इंग्रजी भाषा अवगत असणे ही सध्याच्या आधुनिक युगात गरजेची बाब झालेली आहे आणि तिला पर्याय नाहीच. तथापि इंग्रजी भाषा शिकणे आणि शालेय शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असणे यामध्ये खूप मोठा फरक आहे.

बालकांचे शालेय शिक्षण मातृभाषेतून झाल्यास त्याला प्रत्येक विषयाच्या संकल्पना, संबोध चांगल्या पद्धतीने आत्मसात होतात असे शिक्षणतज्ज्ञांचे मत आहे. जगाच्या पाठीवर फ्रान्स, जर्मनी, चीन, जपान इत्यादी अनेक देशांमध्ये शालेय शिक्षण हे मातृभाषेतून दिले जाते. काही देशांमध्ये तर इंग्रजी माध्यमाचा पर्यायही उपलब्ध नाही. आज ते देश जगात विकसित देश म्हणून गौरवले जात आहेत. भारतात मात्र इंग्रजी, सेमी-इंग्रजी अशा माध्यमांनी अगदी खेड्यापाड्यात चंचूप्रवेश केला आहे. त्यापैकी काही शाळांत तर नावालाच इंग्रजी माध्यम आहे. तेथील शिक्षक हे मराठी माध्यमाचे प्रशिक्षित शिक्षक असतात. अध्यापन प्रक्रियेत तर इंग्रजीचा वापर किती हा संशोधनाचा विषय ठरेल अशी परिस्थिती आहे. अशा शाळांच्या दिखाऊपणाला अनेक पालक बळी पडतात आणि तिथे आपल्या मुलाला प्रवेशित करून नाही म्हटले तरी त्याचे भवितव्य बिघडविण्यास स्वतः कारणीभूत ठरतात.

अशा या परिस्थितीमध्ये मुलांच्या शाळाप्रवेशाबत निर्णय घेताना मातृभाषा माध्यम असणाऱ्या, बालकांना निरीक्षण, कृती व अनुभवातून शिकण्याची जास्तीत जास्त संधी देणाऱ्या, बालकेंद्री व बालसुलभ शिक्षण प्रक्रिया राबवणाऱ्या, पालक-बालक-शिक्षक-समाज हा चौकोन सांधणाऱ्या शाळा निवडून अशा शाळेत मुलाला पाठवून त्यांच्या भवितव्याबाबत ठाम निर्णय घेणे आवश्यक आहे.

मग प्रश्न पडतो की अशा शाळा कोणत्या हे कसे समजणार? यासाठी पालकांनी जागृत राहून परिसरातील शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांशी संवाद साधावा. तसेच त्या शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक यांच्याशी अनौपचारिक संवादातून शाळेचे अंतरंग समजून घ्यावेत. त्या शाळेमधून बाहेर पडलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या यशापयशाची चिकित्सा करावी. आणि हो, शक्य असेल तर शाळांच्या दैनंदिन कामकाजाचे निरीक्षण प्रत्यक्ष शाळेत जाऊन करावे. काही शाळा असे स्वातंत्र्य पालकांना देतात. हे स्वातंत्र्य नाकारणाऱ्या शाळा कोणत्या पंक्तीत बसतात हे अधिक सांगणे न लगे...

सध्याच्या शिक्षणक्षेत्राचा विचार करता बालकांच्या सर्वांगीण विकासाला पोषक वातावरण निर्माण करणाऱ्या शाळा किती आहेत आणि त्या आपल्या परिसरात उपलब्ध आहेत का हे प्रश्न विचारी पालकांना नक्की पडतील. आणि दुर्दैवाने अशा शाळा फार कमी सापडतील. सर्व शाळा अशा स्वरूपाच्या होण्यासाठी समाजाचा, पालकांचा दृष्टिकोन, त्यांच्या इच्छा-आकांक्षा बदलणे गरजेचे आहे. जेव्हा सर्वच शाळांवर या पालक-दबावामुळे एक नैतिक जबाबदारी येऊन पडेल तेव्हा आपल्या सर्व बालकांचे भवितव्य नक्कीच चांगल्या हातात असेल यात शंका नाही.


**डॉ.राजेश बनकर**
rajeshmbankar@gmail.com
9850252380


### मी मराठी शाळेत शिकवतीय

मी मराठी शाळेत शिकवतीय.
इंग्रजी शाळेकडे जाणारा लोंढा वाढत असताना,
मी मराठीतून शिकवतीय.
मी भाषा नाही,
जगण्याचं एक अंग शिकवतीय.
मी माती अन्
पायांना लागणारा चिखल शिकवतीय...
मी मायेनं आईनं 'गोदीत घेणं'
काजळाची तीट लावणं
अन पोटाला चिमटा घेऊन स्वतःच्या,
लेकराच्या मुखी घास भरवणं शिकवतीय...
मी मराठी शिकवतीय.
बोली अन प्रमाण या वादाच्या पलीकडचं
वांझोट्या समीक्षेपलीकडचं
'बहुभाषिकतेचं' स्वप्न उराशी घेऊन
काही 'आपलसं' शिकवतीय
मी जीवनभाषा शिकवतीय...

मी खेड्या-पाड्यातनं
पहिल्यांदा शाळेत येणाऱ्या पिढ्यांना
हात धरून शिकण्याच्या वाटेवर नेतीय,
त्यांना स्वतःची ओळख न पुसू देता
नवी ओळख बनवायला हात देतीय
मी स्वप्नांचे पंख देतीय...

मी मराठी शिकवतीय
धडे अन कवितांसोबतच
पुरोगामी महाराष्ट्राचं
छोटंछोटं बी मनामनात रुजवतीय..
मी मराठी शिकवतीय...
मी मराठी शाळेत शिकवतीय...

(इथे मराठी म्हणजे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात बोलली जाणारी हरतऱ्हेच्या मराठीची रूपे असा अर्थ आहे. केवळ प्रमाण भाषा नाही.)


**फारूक काझी**
faruk_skazi@yahoo.com
8275459276

# पुस्तक परीक्षण

## शाळा: एक स/मजा

हल्ली शहरी भागांमध्ये मूल दोन-अडीच वर्षाचे झाले की त्याला शाळेत घालायची, किंवा 'टाकायची' किंवा अडकवायची तयारी सुरू होते. मग शाळा कोणती, माध्यम कोणते यावर जोरजोरात चर्चा चालतात. पण खूप वेळा मला तर असे वाटते की हे वादविवाद, चर्चा उगाच टाईमपास म्हणून चालत असावेत. कारण माध्यम काय, इंग्रजीच, हे आधीच ठरलेले असते, आणि शाळा कोणती तर शक्यतो चकचकीत दिसणारी, स्मार्ट युनिफॉर्म असणारी आणि चारचौघात सांगताना अभिमान वाटावा अशी, हेही ठरलेले असते. शहरांमध्ये तर शाळेत प्रवेशासाठीसुद्धा चुरस लागलेली असते. मूल जन्मल्यापासूनच विचार आणि विचारपूस सुरू होते. कारण चांगल्या शाळेत प्रवेश म्हणजे चांगल्या पैश्यांची तयारी करायची असते. काही 'चांगल्या' शाळा वय वर्षे दीडपासूनही प्रवेश देतात. मग आपला चान्स' जायच्या आत पालक प्रवेश घेऊन टाकतात. पण मग हेच पालक ४-५ वर्षांनंतर त्या शाळेबद्दल तक्रारी करताना दिसतात. शिक्षक प्रशिक्षित नाहीत, किंवा मुलांना शाळेत जायचा कंटाळा येतो, किंवा होमवर्क फारच असतो इ. इ.




छोट्या गावांमध्येही तथाकथित इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडेच पालकांचा ओढा दिसतो. अशिक्षित पालकांनाही मुले इंग्रजी माध्यमातच हवी असतात. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे इंग्लिश म्हणजे चांगले अशी सर्वसाधारणपणे करण्यात आलेली धारणा आणि या भाषेमुळे आपली आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारेल हा पालकांना असलेला विश्वास. पण प्रत्येक मूल वेगळे असते, प्रत्येक पालक वेगळे असतात आणि प्रत्येकाची परिस्थिती वेगळी असते. तेव्हा सगळ्यांच्या प्रश्नांचे एकच खात्रीशीर योग्य उत्तर कसे असणार? म्हणूनच प्रत्येक पालकाने आपल्या मुलांच्या गरजा समजून घेऊन शाळेची निवड करणे आवश्यक आहे.

**शाळा: एक स/ मजा**
संकल्पना – विनोदिनी काळगी
लेखन – अरुण ठाकूर, राज काळगी
रेखाटने – वृषाली जोशी
प्रकाशक – आविष्कार शिक्षण संस्था,
द्वारा आनंद निकेतन, नाशिक
देणगी मूल्य – रु. ६०

शाळेची निवड करताना नक्की काय काय बघावे आणि कशाचा विचार करावा हे सांगणारे एक पुस्तक सध्या उपलब्ध आहे – शाळा: एक स/मजा. नाशिकच्या आनंद निकेतन शाळेने काढलेल्या पुस्तकाचे वैशिष्ट्य हे आहे की अतिशय सोप्या भाषेत चित्रे आणि संभाषण स्वरूपात हे पुस्तक आहे.

शाळेच्या बाहेरील रुपड्याला न भुलता मुलांची जिज्ञासू वृत्ती जिवंत ठेवणाऱ्या शाळा निवडा असे आव्हान हे पुस्तक करते. बऱ्याच पालकांना शाळा निवडीच्या वेळी पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करते. शिक्षणाचे माध्यम, शाळेतील उपक्रम, मूल्यमापन पद्धत याबाबत चर्चा करते.

यात शाळेची निवड कशी करावी हे सांगता सांगता शाळा कशी नसावी याबाबतही ऊहापोह केलेला आहे. परंतु सरकारी शाळांबद्दल या ठिकाणी बराचसा नकारात्मक सूर लागलेला दिसतो. उदाहरणार्थ – नगरपालिकेच्या शाळेबाबत बोलणारे चहावाले, सफाई कामगार 'मास्तर येतच नाहीत,' 'शाळा म्हणजे कोंडवाडा आहे' असे बोलतात. सगळ्याच सरकारी शाळा वाईटच असतात असा समज इथे होण्याची शक्यता आहे, जसे खचितच नाही. हाच या पुस्तकाचा थोडा कच्चा दुवा आहे असे म्हणता येईल. भरपूर पर्याय उपलब्ध असलेल्या शहरी पालकवर्गाला डोळ्यांसमोर ठेऊन पुस्तक लिहिले आहे असे जाणवते. शिवाय आनंददायी शिक्षण देणाऱ्या आदर्श म्हणता येईल अशा शाळेचे यात वर्णन आहे, जशी खरे तर प्रत्येकच शाळा असायला हवी, परंतु सध्या तरी अशा शाळांचे फारसे पर्याय उपलब्ध नाहीत. असा पर्याय नसताना पालकांनी काय विचार करावा याबाबत अधिक विश्लेषण फायद्याचे ठरले असते.

त्यामुळे खरे तर पालकांना उद्देशून लिहिले असले तरी शाळांनी शिकण्याजोगे या पुस्तकात बरेच काही आहे. शाळेत येताना मुले आनंदाने आली तरच ती मनापासून शिकतील, म्हणूनच मुलांना आनंदही मिळेल आणि शिक्षणही अशी अध्यापन पद्धती विकसित करणे हे शिक्षकांचे काम आहे. ते मोठे आव्हानात्मक आहे, पण हे आव्हान पेलणे शिक्षकांना शक्य वाटेल अशी साधी, सोपी दैनंदिन उदाहरणे पुस्तकात मांडली आहेत. उदा. शाळेतील मुले इतिहास शिकताना त्याचे नाट्यरूपांतर करू शकतील, किंवा स्वतः अश्मयुगातील हत्यारे बनवतील किंवा पर्जन्यमापक तयार करतील

(पान १३ वर)